दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


## सुविचार

सुख म्हणजे बाहेरून मिळणारी गोष्ट नाही, तर मनाची अवस्था आहे; समाधान, कृतज्ञता आणि स्वीकार यांची जोड लागली, की आयुष्यात आनंद फुलतो. विचार आणि कृतीतून त्याचे संवर्धन करणे शिकावे.

## 'भारत टॅक्सी' सुरू

**नवी दिल्ली :** देशातील पहिली सहकारी टॅक्सी सेवा, 'भारत टॅक्सी' ॲप, आज सरकारकडून लॉंच केली जाणार आहे. ड्रायव्हर-मालकी मॉडेलवर आधारित, भारत टॅक्सी ॲप राईड्समधून कोणतेही कमिशन कापणार नाही आणि संपूर्ण उत्पन्न ड्रायव्हरला जाणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा ते लॉंच करणार आहेत. सुरुवातीला, ते दिल्ली-एनसीआरमध्ये लॉंच केले जात आहे. मुंबई, बेंगळुरू आणि चेन्नई सारख्या प्रमुख शहरांमध्ये टप्प्याटप्प्याने ही सेवा सुरू केली जाईल.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. ०६ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १३४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### बेकायदेशीर खाणीत स्फोट, १६ दगावले

**शिलॉंग :** मेघालयातील पूर्व जैंतिया हिल्स जिल्ह्यातील एका "बेकायदेशीर" कोळसा खाणीत गुरुवारी झालेल्या स्फोटात किमान १६ कामगारांचा मृत्यू झाला आणि अनेक जण अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे, असे पोलिस महासंचालक आय नोंगरांग यांनी सांगितले. बचाव पथके शोध कार्यात गुंतली असून, ही घटना सकाळी थांगस्कू परिसरात घडली. आम्हाला आतापर्यंत १६ मृतदेह सापडले आहेत. स्फोटाच्या वेळी खाणीत किती कामगार उपस्थित होते याची नेमकी संख्या अद्याप समजू शकलेली नाही. आणखी लोक अडकल्याची भीती आहेत.

### कुपवाडा येथे तिरंगा बाईक रॅली

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यातील एका नागरी समाज गटाने गुरुवारी नियंत्रण रेषेच्या पलीकडे पाकिस्तानी सैन्याने आयोजित केलेल्या काश्मीर एकता दिनाच्या "प्रतिवाद" करण्यासाठी तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन केले. पाकिस्तानी लष्कराने आयोजित केलेल्या तथाकथित काश्मीर एकता दिनाबाबतच्या प्रचाराला विरोध करणे हा या रॅलीचा उद्देश आहे, असे आयोजकांनी सांगितले.

### केरळमध्ये परिचारिका संघटना संप करणार

**त्रिशूर (केरळ) :** खासगी रुग्णालयांमधील परिचारिकांचा मूळ पगार ४०,००० रुपये करावा या मागणीसाठी यूएनए प्रतीकात्मक संप करणार आहे, असे त्यांच्या नेत्यांनी गुरुवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले. पत्रकारांशी बोलताना युनायटेड नर्सेस असोसिएशनचे संस्थापक जमिन्शा म्हणाले की, गेल्या सात वर्षांत खासगी आरोग्य सेवा क्षेत्रात वेतनात कोणताही बदल झालेला नाही.

## पंतप्रधानांना लोकसभेत न येण्याची विनंती केल्याचा सभापतींचा दावा

# 'अनपेक्षित कृत्याची माहिती होती'

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी गुरुवारी संसदेत गंभीर आरोप करत सांगितले की, काँग्रेस पक्षातील काही सदस्य पंतप्रधान नरेंद्र मोदींविरुद्ध "अनपेक्षित कृत्य" करण्याचा विचार करत असल्याची त्यांच्याकडे ठोस माहिती होती. ही परिस्थिती लक्षात घेऊनच त्यांनी पंतप्रधानांना लोकसभेत उपस्थित राहू नये अशी विनंती केली होती, असे बिर्ला यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला उत्तर देण्यासाठी पंतप्रधान मोदी लोकसभेत उपस्थित राहिले नाहीत, याबाबत खुलासा करताना बिर्ला म्हणाले, ही घटना घडली असती तर देशाच्या लोकशाही परंपरांचे तुकडे झाले असते. हे टाळण्यासाठी मी पंतप्रधानांना सभागृहात येऊ नये अशी विनंती केली आणि सभापती म्हणून सभागृहाची प्रतिष्ठा राखण्याची जबाबदारी माझी होती, अशी धक्कादायक माहिती त्यांनी दिली.

विरोधी पक्षांच्या घोषणाबाजीमुळे वारंवार तहकूब झाल्यानंतर दुपारी ३ वाजता सभागृह पुन्हा सुरू झाले. यावेळी सभापती बिर्ला यांनी बुधवारी सभागृहात घडलेल्या घटनांवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. लोकसभेच्या इतिहासात कधीही न पाहिलेले वर्तन काही सदस्यांनी केले. हे दृश्य लोकशाही परंपरांवर लागलेला काळा डाग आहे, असे ते म्हणाले. सभापतींच्या कार्यालयाची प्रतिष्ठा संविधानाने निश्चित केली असून, राजकीय मतभेद अशा प्रकारे सभागृहात आणणे अयोग्य असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.

सभागृह नेते राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देणार होते, त्या वेळी काही काँग्रेस सदस्य पंतप्रधान जिथे बसतात त्या ठिकाणी जाऊन अनपेक्षित कृत्य करू शकतात, अशी ठोस माहिती मिळाली होती, असा आरोपही त्यांनी केला. पंतप्रधान मोदी लोकसभेत आले नाहीत, त्यामुळे संभाव्य अप्रिय प्रसंग टळले, असा दावा बिर्ला यांनी केला.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना माजी लष्करप्रमुख जनरल एम.एम. नरवणे यांच्या अप्रकाशित 'स्मरणपत्रा'वर बोलण्याची परवानगी नाकारण्यात आल्याने काँग्रेससह विरोधी पक्ष आक्रमक झाले आहेत. मंगळवारी आठ काँग्रेस खासदारांना निलंबित करण्यात आले. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्षांनी संसद परिसरात आंदोलन सुरू केले.

**असे कधी घडले नाही**

संसदेच्या इतिहासात पंतप्रधानांविरुद्ध "हल्ला करण्यासारखा अनपेक्षित प्रसंग" उद्भवण्याची भीती व्यक्त करून त्यांना सभागृहात उपस्थित राहू नये, अशी विनंती करण्यात आल्याची कोणतीही अधिकृत नोंद यापूर्वी आढळत नाही. जवाहरलाल नेहरूंपासून मनमोहन सिंग यांच्यापर्यंत अनेक पंतप्रधानांना तीव्र गोंधळ, घोषणाबाजी आणि वॉकआउट्सचा सामना करावा लागला असला, तरी संसदेच्या आत त्यांच्या सुरक्षेवर धोका असल्याचा इशारा देत सभापतींनी हस्तक्षेप केल्याचा प्रसंग इतिहासात दिसत नाही. या पार्श्वभूमीवर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केलेला दावा अभूतपूर्व ठरतो. अनपेक्षित कृत्य घडण्याची माहिती असल्याचे सांगत त्यांनी पंतप्रधान मोदींना सभागृहात न येण्याची विनंती केल्याने संसदीय सुरक्षेचा मुद्दा राजकीय गदारोळाच्या पलीकडे गेला आहे. लोकशाही संस्थांच्या सुरक्षिततेविषयी गंभीर चिंता निर्माण करणारा हा प्रसंग ठरला आहे.

## राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर आभार प्रस्ताव मंजूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** लोकसभेत सलग दुसऱ्या दिवशीही झालेल्या प्रचंड गदारोळामुळे संसदेचे कामकाज तहकूब करण्यात आले. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आज लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देणार नाहीत, असा निर्णय घेण्यात आला. बुधवारी सायंकाळी पाच वाजता त्यांचे भाषण होणार होते, मात्र काँग्रेससह विरोधी पक्षांच्या खासदारांनी केलेल्या घोषणाबाजीमुळे ते शक्य झाले नाही.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्ताव अखेर पंतप्रधानांच्या भाषणाविना मंजूर करण्यात आला. २००४ नंतर प्रथमच अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. २००४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनाही या चर्चेला उत्तर देता आले नव्हते. यावेळी चर्चेदरम्यान केवळ तीन खासदारच आपले भाषण पूर्ण करू शकले.

परंपरेनुसार, राष्ट्रपती संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित केल्यानंतर त्यांच्या अभिभाषणावर दोन्ही सभागृहांत चर्चा होते आणि त्याच्या शेवटी पंतप्रधान उत्तर देतात. मात्र यंदा लोकसभेत सततच्या गोंधळामुळे ही परंपरा खंडित झाली.

लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी आभार प्रस्तावावर विरोधी पक्षांनी मांडलेल्या सूचना सभागृहासमोर ठेवल्या, मात्र त्या फेटाळण्यात आल्या. त्यानंतर आवाजी मतदानाद्वारे आभार प्रस्ताव मंजूर करण्यात आला. या प्रक्रियेदरम्यानही सभागृहात घोषणाबाजी सुरूच होती. गोंधळ वाढत गेल्याने कामकाज तहकूब करण्यात आले.

## मुंबई मनपा: फडणवीस-शिंदे यांची आज निर्णायक बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या निकालानंतर महापौर, उपमहापौर आणि स्थायी समिती अध्यक्षपदाचा तिढा जवळपास सुटला असून, या संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज बैठक होणार आहे. यात अंतिम नावे निश्चित होण्याची शक्यता आहे. महापौरपदासाठी भाजपकडून राजश्री शिरवळकर, रितू तावडे आणि शीतल गंभीर या तीन नावांची चर्चा सुरू आहे. उपमहापौरपद शिंदे गटाच्या शिवसेनेकडे जाणार असून, तृष्णा विश्वासराव आणि यामिनी जाधव या दोन नावांवर विचार सुरू आहे. स्थायी समिती अध्यक्षपदही भाजपकडेच राहणार असल्याची माहिती आहे.


यंदा मुंबई महापालिकेला सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर झाल्याने मुंबईच्या कारभाराची धुरा महिलांकडे जाणार आहे. दरम्यान, महापौरपदाची निवडणूक बिनविरोध होणार का, यावर चर्चा असतानाच उद्धव ठाकरे यांनी उमेदवार देण्याचे संकेत दिले आहेत. आमदार आदित्य ठाकरे यांनी आमची माणसं कामाला लागली आहेत, असे विधान केल्याने ठाकरे गट उमेदवारी अर्ज भरण्याची शक्यता आहे. जरी त्यांच्या पक्षाकडे बहुमत नसले, तरी प्रतीकात्मक आणि राजकीय लढत देण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे.

महायुतीकडे भाजपचे ८९, शिंदे शिवसेनेचे २९ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे ३ असे एकूण १२१ नगरसेवकांचे संख्याबळ आहे. त्यामुळे भाजपचा महापौर निवडून येण्यात कोणतीही अडचण राहणार नसल्याचे स्पष्ट चित्र आहे. आता फक्त औपचारिक घोषणा बाकी असून, आजच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महामार्ग प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

# एक्सप्रेसवेवरील वाहतूक ३३ तासांनी पूर्ववत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरील मुंबईकडे जाणारी वाहतूक गुरुवारी पहाटे अखेर पूर्ववत झाली. मंगळवारी सायंकाळी आडोशी बोगद्याजवळ अत्यंत ज्वलनशील प्रोपीलीन वायू वाहून नेणारा टँकर उलटल्याने तब्बल ३३ तास हा मार्ग बंद ठेवण्यात आला होता, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

मंगळवारी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. टँकर मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर उलटल्याने मोठा धोका निर्माण झाला होता. संभाव्य स्फोट आणि गॅस गळतीचा धोका लक्षात घेऊन प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण कॅरेजवे तात्काळ बंद केला. परिणामी देशातील सर्वाधिक वर्दळीच्या महामार्गांपैकी एक असलेल्या या मार्गावर भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, गुरुवारी पहाटे १.४६ वाजता अपघातग्रस्त टँकर सुरक्षितरीत्या घटनास्थळावरून हटवण्यात आल्यानंतर वाहतूक सुरू करण्यात आली. बुधवारी रात्री उशिरा टँकरमधील प्रोपीलीन गॅस इतर सुरक्षित टँकरमध्ये हलवण्यात आला होता. त्यानंतर हेवी-ड्युटी क्रेनच्या मदतीने उलटलेला टँकर बाहेर काढण्यात आला.

दीर्घकाळ मार्ग बंद राहिल्याने वाहतुकीची कोंडी कमालीची वाढली होती. काही टप्प्यांवर २० किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. महिला, लहान मुले आणि वृद्धांसह हजारो प्रवासी अन्न, पाणी आणि शौचालयाच्या सुविधांशिवाय तासन्तास अडकून पडले. त्यामुळे संताप आणि अस्वस्थता मोठ्या प्रमाणात व्यक्त करण्यात आली.

घाटातील क्लिअरन्स ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतर वाहतूक हळूहळू सुरळीत झाली, मात्र अनेक जड वाहने अडकून राहिल्याने काही काळ कोंडी कायम होती. पोलिसांनी सांगितले की, मार्ग पुन्हा सुरू झाल्यानंतर काही तासांतच परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झाली. तथापि, गुरुवारी सकाळी सुमारे ७.३० वाजता अमृतांजन पुलाजवळ काही जड वाहनांमध्ये बिघाड झाल्याने वाहतूक काही काळ मंदावली.

या धोकादायक परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, महामार्ग पोलिस आणि एमएसआरडीसीची पथके तैनात करण्यात आली होती. गॅसचे सुरक्षित हस्तांतरण आणि टँकर हटवण्याची कारवाई संयुक्तपणे राबवण्यात आली.

या घटनेचा फटका सार्वजनिक वाहतुकीलाही बसला. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अनेक बसेस एक्सप्रेसवेवर अडकून पडल्या, तर अनेक नियोजित फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. याशिवाय, दूध, भाजीपाला यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावरही परिणाम झाला, कारण मालवाहू वाहने तासन्तास कोंडीत अडकली होती.

# राज्यातील शाळांमध्ये असुविधांचा बाजार

## शिक्षण विभागाच्या सांख्यिकी अहवालातून धक्कादायक वास्तव उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील शालेय शिक्षण व्यवस्थेचे गंभीर वास्तव समोर आले असून, तब्बल १,१६४ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची सुविधा नसल्याचे उघड झाले आहे. तसेच ३,३२८ शाळांमध्ये अद्याप वीजपुरवठा उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती शिक्षण विभागाच्या २०२४ ते २०२६ या कालावधीतील सांख्यिकी अहवालातून समोर आली आहे. मात्र मुंबई, गोंदिया, कोल्हापूर, सातारा आणि ठाणे या जिल्ह्यांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची शंभर टक्के सुविधा असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.

हा अहवाल २९ जानेवारी रोजी शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना सादर करण्यात आला. त्यानुसार, मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या शाळांमध्ये १,०४३ शासकीय, ६४ खासगी अनुदानित, २० खासगी विनाअनुदानित आणि ३७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. शिक्षणतज्ज्ञांच्या मते, किशोरवयीन मुलींसाठी सुरक्षित व स्वच्छ प्रसाधनगृहांची अनुपस्थिती थेट शाळा गळती वाढवणारी बाब आहे.

अहवालानुसार वीज नसलेल्या ३,३२८ शाळांपैकी ३,१०२ शासकीय, १३१ खासगी अनुदानित, १९ विनाअनुदानित आणि ७६ सेल्फ फायनान्स शाळा आहेत. वीज नसलेल्या शाळांचा सर्वाधिक भार नंदुरबार (४५५), गडचिरोली (४३१), बीड (३८६), नांदेड (२२९), परभणी (२००) आणि हिंगोली (१७४) जिल्ह्यांमध्ये आहे. याशिवाय धुळे (१६३), नाशिक (१६३), संभाजीनगर (१५७), लातूर (१३६) आणि जालना (११८) जिल्ह्यांचाही यात समावेश आहे. वीजअभावी डिजिटल शिक्षण, पंखे आणि प्रकाशयोजना यांवर मर्यादा येत असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा थेट परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

अहवालात आणखी एक गंभीर बाब समोर आली असून, राज्यातील २,४२८ शाळांमध्ये हँडवॉशची सुविधा उपलब्ध नाही. यामध्ये १,५८७ शासकीय, ४५८ खासगी अनुदानित, ५६ विनाअनुदानित आणि ३२७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. स्वच्छतेच्या मूलभूत सुविधांचा अभाव पाहता पालक आणि सामाजिक संघटनांकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या सर्वाधिक ११२ शाळा बीड जिल्ह्यात आहेत. हिंगोली, नांदेड, परभणी, गडचिरोली, जळगाव, अमरावती, नाशिक आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये ५० ते १०० शाळांमध्ये ही सुविधा उपलब्ध नाही.

## शशी थरूर यांच्या मुलाला नारळ

**नवी दिल्ली :** जागतिक मार्केटमध्ये सध्या प्रचंड खळबळ उडाली आहे. सगळीकडे कॉस्ट कटिंग सुरू झालं आहे. त्यामुळे नोकऱ्या जात आहेत शिवाय नवीन नोकरी लवकर मिळत नसल्याने दबाव आहे. सर्वसामान्य लोकच काय तर नेत्यांची मुलंही या कॉस्ट कटिंगचे बळी होताना पाहायला मिळाले. शशी थरूर यांच्या मुलाला अचानक उद्यापासून तुम्ही येऊ नका असं सांगण्यात आलं. कॉस्ट कटिंगचा फटका त्याला बसला आणि त्याची नोकरी गेली. त्याने ट्विटरवर आपल्या ऑफिसमधला एक फोटो शेअर करून वाईट दिवस असं कॅप्शन दिलं आहे. अमेरिकेतून मुलाच्या नोकरीबाबत चिंताजनक बातमी आली असल्यामुळे शशी थरुर यांचे टेन्शन वाढले असल्याचे मानले जात आहे.

# जि.प.-पं.स. निवडणूक प्रचाराची सांगता; ७ फेब्रुवारीला मतदान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी जाहीर प्रचाराची गुरुवारी (५ फेब्रुवारी) रात्री १० वाजता सांगता होत आहे. या निवडणुकांसाठी शनिवारी, ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे.

मतदानाच्या ४८ तास आधी जाहीर प्रचार थांबवण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वीच दिले होते. त्यानुसार रात्री १० वाजल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या जाहीर सभा, प्रचारफेरी किंवा ध्वनिक्षेपकांचा वापर करता येणार नाही. निकाल जाहीर होताच संबंधित ठिकाणची आदर्श आचारसंहिता तात्काळ संपुष्टात येणार आहे.

राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले की, जाहीर प्रचार संपल्यानंतर उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांना घरोघरी जाऊन वैयक्तिक संपर्क साधत प्रचार करण्यास मुभा राहील. मात्र, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम २८-ब (१) नुसार मतदानाच्या आधीच्या २४ तासांत आणि मतदानाच्या दिवशी कोणतीही सार्वजनिक सभा अथवा प्रचार करता येणार नाही.

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे पुणे जिल्ह्यात यंदा मोठ्या जाहीर सभा टाळण्यात आल्या. भाजप आणि शिवसेनेकडूनही कोणत्याही बड्या नेत्यांच्या भव्य सभा झाल्या नाहीत. काँग्रेसतर्फे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या काही मोजक्या सभा झाल्या, एवढाच अपवाद ठरला.

जाहीर प्रचार थांबल्यानंतर पुढील दोन दिवसांत डोअर-टू-डोअर प्रचाराला वेग येण्याची शक्यता असून, मतदान शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस व निवडणूक यंत्रणा सज्ज असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे.

## ऊर्जा धोरणावर केंद्र सरकारने स्पष्ट केली आपली भूमिका

# तेल आयात, ट्रम्प यांचा दावा आणि भारताचे प्रत्युत्तर

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या तेल आयातीबाबत केलेल्या अलिकडच्या दाव्याला भारताने ठाम आणि स्पष्ट प्रत्युत्तर दिले आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी थांबवून व्हेनेझुएलाकडून तेल घेईल, असा दावा ट्रम्प यांनी केला होता. मात्र, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने हा दावा अतिसरलीकरण करणारा असल्याचे स्पष्ट करत भारताच्या ऊर्जा धोरणाची व्यापक चौकट समोर ठेवली आहे.

वृत्तसंस्थेनुसार, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, व्हेनेझुएला हा भारताचा ऊर्जा क्षेत्रातील दीर्घकालीन भागीदार आहे. "व्यापार आणि गुंतवणूक या दोन्ही बाबतीत व्हेनेझुएलासोबत भारताचे संबंध जुने आहेत. २०१९-२० पर्यंत भारत व्हेनेझुएलामधून कच्च्या तेलाची आयात करत होता. त्यानंतर आंतरराष्ट्रीय निर्बंधांमुळे ही आयात थांबवावी लागली," असे त्यांनी स्पष्ट केले.

जयस्वाल यांनी सांगितले की, २०२३-२४ या कालावधीत भारताने व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी पुन्हा सुरू केली होती. मात्र, निर्बंध पुन्हा लागू झाल्यानंतर ती प्रक्रिया थांबवावी लागली. "ऊर्जा सुरक्षेच्या आमच्या दृष्टिकोनानुसार, भारत कोणत्याही कच्च्या तेलाच्या पुरवठ्याचे व्यावसायिक फायदे तपासण्यास तयार आहे. मात्र, हे सर्व निर्णय जागतिक निर्बंध आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेऊन घेतले जातात," असेही त्यांनी नमूद केले.

परराष्ट्र मंत्रालयाने यावेळी भारताच्या ऊर्जा खरेदी धोरणाची मूलभूत दिशा स्पष्ट केली. बदलत्या जागतिक बाजारपेठेतील स्थिती आणि आंतरराष्ट्रीय राजकीय वातावरणानुसार ऊर्जा स्रोतांमध्ये विविधता आणणे हा भारताच्या धोरणाचा केंद्रबिंदू असल्याचे मंत्रालयाने सांगितले. "१.४ अब्ज लोकसंख्येच्या देशासाठी ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करणे ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे," असे जयस्वाल यांनी ठामपणे सांगितले.


दरम्यान, भारत-अमेरिका व्यापार कराराच्या घोषणेनंतर ट्रम्प यांनी हा दावा केला होता. ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिले की, भारत रशियन तेल खरेदी थांबवेल आणि व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करून युक्रेन युद्ध संपवण्यास मदत करेल. मात्र, जागतिक तेल बाजारपेठेतील गुंतागुंत आणि बहुपक्षीय राजकारण लक्षात घेता, हा दावा वास्तवाशी फारकत घेणारा असल्याचे निरीक्षकांचे मत आहे.

या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी भारतावरील शुल्कात मोठी कपात करण्याची घोषणाही केली आहे. अमेरिका भारतावरील एकूण शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करत असल्याचे त्यांनी सांगितले. यापैकी २५ टक्के शुल्क रशियन तेल आयातीशी संबंधित होते. व्हाईट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल भारतातून येणाऱ्या आयातींवर लादण्यात येणारा अतिरिक्त २५ टक्के दंडात्मक शुल्क आता रद्द करण्यात येत आहे.

एकूणच, ट्रम्प यांच्या दाव्यांना प्रत्युत्तर देताना भारताने आपली ऊर्जा कूटनीती स्पष्टपणे मांडली आहे. कोणत्याही एका देशावर अवलंबून न राहता, व्यावसायिक व्यवहार, जागतिक निर्बंध आणि राष्ट्रीय हित या तिन्हींचा समतोल साधणे हीच भारताची भूमिका असल्याचे या प्रकरणातून अधोरेखित झाले आहे.

# सुनेत्रा पवारांची भूमिका ९ तारखेनंतर होणार स्पष्ट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** उपमुख्यमंत्री (दिवंगत) अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यातील राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली असून, नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांची पुढील भूमिका काय असेल, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सुनेत्रा पवार ९ फेब्रुवारीनंतर आपली भूमिका महाराष्ट्रासमोर मांडणार असल्याची महत्त्वाची माहिती समोर आली असून, त्यांच्या वक्तव्याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, ९ फेब्रुवारीपर्यंत सुनेत्रा पवार बारामतीतच थांबणार असून, तोपर्यंत कोणत्याही राजकीय मंचावर सक्रिय भूमिका घेणार नाहीत किंवा माध्यमांसमोर आपली बाजू मांडणार नाहीत. अजित पवार यांच्या निधनाला १२ दिवस पूर्ण झाल्यानंतर, घरातील दुखवटा संपल्यानंतरच सार्वजनिक भूमिका मांडण्याचा त्यांचा निर्णय असल्याचे सांगितले जाते. बारामती हे पवार कुटुंबीयांचे राजकीय केंद्र मानले जाते. त्यामुळे याच ठिकाणाहून सुनेत्रा पवार आपली पुढील दिशा आणि भूमिका स्पष्ट करणार का, याकडे नेत्यांसह सर्वसामान्यांचेही लक्ष केंद्रित झाले आहे.

## संपादकीय

### टोलचा हक्क आणि प्रवाशांची परवड



**मुंबई–पुणे एक्सप्रेसवे ३३ तास ठप्प राहतो आणि यंत्रणा केवळ स्पष्टीकरणे देण्यात धन्यता मानते. टोल भरूनही मूलभूत सेवा न मिळणे, प्रवाशांची अमानवी परवड आणि प्रशासनाची निष्क्रियता या घटनेतून पायाभूत व्यवस्थेचे विदारक अपयश उघड झाले.**

चांगले रस्ते हवे असतील, टोल हा भरावाच लागेल, असे संसदेत नितीन गडकरी म्हणाले होते. प्रवाशांनी त्यालाही विरोध केला नाही. तथापि, टोल भरूनही मूलभूत सेवा न मिळणे, प्रवाशांची अमानवी परवड होणे आणि प्रशासनाची निष्क्रियता या घटनेतून पायाभूत व्यवस्थेचे विदारक अपयश उघड करण्याचे काम चोखपणे केले. मुंबई–पुणे एक्सप्रेसवे तब्बल ३३ तास ठप्प राहतो आणि महामार्ग मंडळ, राज्य यंत्रणा, खासगी कंत्राटदार तसेच प्रशासनाकडून एकही ठोस जबाबदारी स्वीकारली जात नाही, ही बाब असुविधाजनक नाही; तर ती व्यवस्थेच्या अपयशाची दिलेली अप्रत्यक्ष कबुली आहे. प्रगत पायाभूत सुविधा, वेगवान महामार्ग आणि ‘जागतिक दर्जा’ अशा घोषणांच्या पोकळपणावर यामुळे शिक्कामोर्तब झाले आहे. मुंबई–पुणे एक्सप्रेसवे हा राज्याचा अभिमान मानला जातो. दोन आर्थिक केंद्रांना जोडणारा हा मार्ग वेळ, पैसा आणि इंधन वाचवतो, असा दावा सातत्याने केला जातो. त्यासाठी प्रवाशांकडून नियमितपणे टोल वसूल केला जातो. मात्र ३३ तासांची अभूतपूर्व कोंडी हा प्रश्न उपस्थित करते ती हा टोल नेमका कशासाठी? केवळ रस्ता वापरण्यासाठी, की संकटसमयी असुविधेत भर पडण्यासाठी? या कोंडीचे कारण अपघात होते, हे मान्य. अपघात टाळता येत नाहीत, हेही मान्य. पण अपघातानंतरची यंत्रणांची प्रतिक्रिया हीच खरी कसोटी असते. तीच इथे पूर्णपणे अपयशी ठरली. पर्यायी मार्गांची घोषणा नाही, प्रवाशांना माहिती देण्याची कोणतीही प्रभावी यंत्रणा नाही, वाहतूक नियंत्रणाचा ठोस आराखडा नाही. परिणामी हजारो नागरिक गाड्यांत अडकून पडले. पाणी, अन्न, औषधांशिवाय, शौचालयांची सोय नसताना, लहान मुले आणि वृद्धांसह हे दृश्य विदारक होते. हा प्रश्न केवळ वाहतूक व्यवस्थेचा नाही; तर तो सार्वजनिक सेवांच्या समन्वयाचा आहे. पोलीस, महामार्ग प्राधिकरण, कंत्राटदार, आपत्कालीन सेवा या सगळ्यांचे नियंत्रण एका छताखाली असणे अपेक्षित असते. प्रत्यक्षात मात्र प्रत्येक जण जबाबदारी दुसऱ्यावर ढकलताना दिसतो. हीच बेपर्वाई प्रवाशांच्या परवडीचे मूळ कारण ठरते. टोल वसुली करणाऱ्या खासगी कंत्राटदारांची भूमिका येथे विशेष प्रश्नांकित होते. टोल म्हणजे केवळ महसूल नव्हे; तर तो सेवेसाठी दिलेले शुल्क आहे. त्या सेवेमध्ये केवळ डांबरी रस्ता नाही, तर आपत्कालीन प्रतिसाद, माहिती व्यवस्थापन, सुरक्षितता आणि सुविधा यांचा समावेश होतो. ३३ तास रस्ता बंद असताना टोल यंत्रणा नेमकी कुठे होती? प्रवाशांसाठी मदत केंद्रे, पाणी, वैद्यकीय सहाय्य का उपलब्ध नव्हते? राज्य सरकारकडूनही यावर ठोस भूमिका येताना दिसत नाही. चौकशीचे आदेश, अहवाल, समित्या हे सगळे शब्द पूर्वीही ऐकले आहेत. प्रत्यक्षात दोषी कोण, जबाबदार कोण आणि शिक्षा कोणाला, याचे उत्तर कधीच स्पष्ट होत नाही. परिणामी प्रत्येक संकटानंतर नागरिकांचा संताप वाढतो आणि व्यवस्था मात्र तशीच राहते. या घटनेने आणखी एक वास्तव समोर आणले आहे. आपण पायाभूत सुविधा उभारताना ‘उद्घाटनयोग्य’ गोष्टींवर भर देतो, पण त्यामागची यंत्रणा सक्षम करत नाही. फ्लायओव्हर, एक्सप्रेसवे, स्मार्ट रोड्स यांची संख्या वाढते; पण संकट व्यवस्थापन, संवाद व्यवस्था आणि मानवकेंद्री दृष्टिकोन मात्र दुय्यम राहतो. मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर अडकलेले प्रवासी हे कुठले ‘अपवादात्मक’ लोक नव्हते. ते कर भरणारे, टोल देणारे, नियम पाळणारे नागरिक होते. त्यांच्याकडून जबाबदारीची अपेक्षा केली जाते; मात्र व्यवस्थेकडून जबाबदारीची अपेक्षा करणे हे जणू गैरसोयीचे मानले जाते. हा प्रश्न एका महामार्गापुरता मर्यादित नाही. तो सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या मॉडेलवरच प्रश्नचिन्ह उभे करतो. नफा खासगी क्षेत्राचा आणि संकटाची किंमत नागरिकांची हा समतोल कधी बदलणार? टोल वसुलीचा अधिकार असेल, तर सेवा न दिल्यास दंड, कंत्राट रद्द करणे किंवा भरपाई देणे हेही तितकेच बंधनकारक का नसावे? ३३ तासांची कोंडी हा एक इशारा आहे. तो दुर्लक्षित केला, तर पुढील वेळी केवळ वाहतूक नव्हे, तर विश्वासही ठप्प होईल. रस्ता मोकळा झाला आहे; पण प्रश्न तसाच आहे. टोल आपण रस्त्यासाठी देतो की व्यवस्थेच्या निष्काळजीपणासाठी? या प्रश्नाचे उत्तर मिळेपर्यंत कोणतेही ‘जागतिक दर्जाचे’ दावे विश्वासार्ह ठरणार नाहीत.

# तेल, टॅरिफ आणि ट्रम्प : भारताची कसोटी

**» ट्रम्प यांच्या एका विधानामुळे भारताच्या ऊर्जा धोरणाकडे पुन्हा जागतिक लक्ष वेधले गेले. तेल आयात, निर्बंध, व्यापार करार आणि राजनैतिक दबाव यांच्या संगमातून भारताची ऊर्जा सुरक्षा किती स्वायत्त आहे, हा खरा प्रश्न या निमित्ताने पुढे आला आहे.**



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प विधानांच्या माध्यमातून धोरण आखण्याची कला चांगलीच आत्मसात करून आहेत. भारत रशियाऐवजी व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करेल, असा त्यांचा दावा केवळ व्यापारविषयक नव्हे, तर राजकीय दबावाचे संकेत देणारा ठरतो. या दाव्याला भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिलेले प्रत्युत्तर केवळ स्पष्टीकरण नसून, भारताच्या ऊर्जा कूटनीतीची तत्त्वे स्पष्ट करणारे आहे. भारताने यापूर्वीही वारंवार सांगितले आहे की ऊर्जा सुरक्षा ही कोणत्याही एका देशावर किंवा गटावर अवलंबून न राहता विविध स्रोतांवर आधारित असली पाहिजे. १.४ अब्ज लोकसंख्येच्या देशासाठी हा केवळ धोरणात्मक नव्हे, तर अस्तित्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे रशिया, मध्य पूर्व, अमेरिका, आफ्रिका किंवा लॅटिन अमेरिका – भारत प्रत्येक पर्यायाकडे व्यावसायिक आणि व्यावहारिक नजरेने पाहतो. व्हेनेझुएला हा भारताचा दीर्घकालीन ऊर्जा भागीदार राहिलेला आहे, हे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट करून एका प्रकारे ट्रम्प यांच्या विधानातील सरलीकरणालाच छेद दिला आहे. ट्रम्प यांचा दावा असा की भारत रशियन तेल खरेदी थांबवून व्हेनेझुएलाकडे वळेल आणि त्यामुळे युक्रेन युद्ध थांबवण्यास मदत होईल. हा युक्तिवाद भावनिक वाटू शकतो, पण तो वास्तवाशी फारकत घेणारा आहे. जागतिक तेल बाजार हा इतका गुंतागुंतीचा आहे की एका देशाच्या खरेदी-विक्रीमुळे युद्ध थांबेल, असे मानणे बालिश ठरेल. भारताने रशियन तेल खरेदी केल्याने जागतिक बाजारातील दर नियंत्रणात राहण्यास मदत झाली, हे पश्चिमी देशही खाजगीत मान्य करतात. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अमेरिकेने भारतावर रशियन तेल आयातीमुळे लादलेले अतिरिक्त शुल्क आता रद्द करण्याचा निर्णय. हा निर्णय व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर घेतला गेला आहे, हे स्पष्ट आहे. म्हणजेच, नैतिकतेचा आव आणणाऱ्या भूमिकेपेक्षा व्यवहाराला प्राधान्य देण्यात आले. ट्रम्प यांच्या ‘आम्ही युद्ध थांबवतो आहोत’ या भाषेमागे अमेरिकन उद्योग, शेतकरी आणि मतदारांचे हित अधिक ठळकपणे दिसते. भारत-अमेरिका व्यापार करारात शुल्क ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी होणे ही भारतासाठी दिलासादायक बाब आहे. पण या सवलतीसोबत अपेक्षा आणि अप्रत्यक्ष अटी जोडलेल्या असतात, याचा अनुभव भारताला नवीन नाही. ऊर्जा खरेदीबाबतही अमेरिका भारताला ‘योग्य’ निर्णय घेण्याचा सल्ला देत राहील. प्रश्न असा की भारत हा सल्ला ऐकून धोरण बदलेल की स्वतःच्या गरजांनुसार निर्णय घेईल? परराष्ट्र मंत्रालयाने दिलेले उत्तर या संदर्भात महत्त्वाचे आहे. “बदलत्या बाजारपेठेतील परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय वातावरणानुसार ऊर्जा स्रोतांमध्ये विविधता” हे वाक्य म्हणजे भारताची अधिकृत भूमिका. यामध्ये कोणाचाही उल्लेख नाही, कोणाचाही अपमान नाही आणि कोणालाही आश्वासन नाही. हीच कूटनीतीची खरी भाषा आहे. व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी पुन्हा सुरू करणे किंवा थांबवणे हे निर्बंधांवर अवलंबून आहे, हे भारताने स्पष्टपणे सांगितले आहे. म्हणजेच, भारत निर्बंध तोडणारा नाही, पण निर्बंध हटले तर संधी सोडणारा देखील नाही. ही भूमिका अनेकदा ‘दुहेरी’ म्हणून टीकेला सामोरी जाते, पण प्रत्यक्षात ती स्वार्थाधिष्ठित आणि वास्तववादी आहे. भारताच्या विरोधकांकडून या मुद्द्यावर सरकारवर टीका होण्याची शक्यता आहे. एकीकडे अमेरिका जवळीक वाढवत असताना, दुसरीकडे रशिया आणि व्हेनेझुएलासारख्या देशांशी संबंध ठेवणे म्हणजे धोरणात्मक संभ्रम, असा आरोप होऊ शकतो. पण आजचे जागतिक राजकारण गटांमध्ये विभागलेले राहिलेले नाही. बहुपोलर जगात प्रत्येक देश आपले हित जपतो. भारतही त्याला अपवाद नाही. ट्रम्प यांच्या विधानांनी एक गोष्ट मात्र स्पष्ट केली आहे:

भारताची ऊर्जा कूटनीती आता जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी आली आहे. ही कूटनीती दबावाखाली बदलणार नाही, असा संकेत परराष्ट्र मंत्रालयाने दिला आहे. प्रश्न इतकाच आहे की आगामी काळात भारत हा स्वायत्ततेचा हा सूर कायम ठेवू शकतो का, की व्यापार सवलतींच्या बदल्यात धोरणात्मक मवाळपणा स्वीकारावा लागेल? ऊर्जा हा केवळ पेट्रोल पंपावरील दरांचा प्रश्न नाही; तो परराष्ट्र धोरण, राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्याचा कणा आहे. ट्रम्प यांच्या विधानांना उत्तर देताना भारताने हे भान ठेवले आहे, हेच या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचे निरीक्षण ठरते.

## पुणे बार असोसिएशन निवडणूक निकाल जाहीर; अ‍ॅड. भुजबल अध्यक्षपदी विजयी

### २०२६–२०२७ कार्यकाळासाठी नव्या कार्यकारिणीची निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** पुणे बार असोसिएशनच्या २०२६–२०२७ या कार्यकाळासाठी झालेल्या निवडणुकांचा अंतिम निकाल मंगळवारी जाहीर करण्यात आला. अध्यक्षपदाच्या लढतीत अ‍ॅड. भुजबल काळुराम बबन यांनी ३ हजार ८०७ मते मिळवत दणदणीत विजय मिळवला. त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांमध्ये अ‍ॅड. गीतांजली ज्ञानोबा बाळकडकर यांना ४०४, तर अ‍ॅड. विशाल शांताराम शिवले यांना ३३८ मते मिळाली.

उपाध्यक्ष पदासाठी सर्वसाधारण गटातून अ‍ॅड. नथे कांतराम तुकाराम यांनी ३ हजार ६११ मते मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, तर अ‍ॅड. मोरे प्रतापराव तानाजीराव २ हजार ७०६ मतांसह द्वितीय क्रमांकावर निवडून आले. महिला राखीव उपाध्यक्षपदी अ‍ॅड. परदेशी प्रितीसिंग जवानीसिंग यांनी ३ हजार ४७ मतांसह विजय मिळवला.

हिशेब तपासनीसपदी अ‍ॅड. निंबाळकर शिवराज मुरलीधर यांनी सर्वाधिक ४ हजार ७९० मते मिळवत विश्वास संपादन केला. महिला राखीव सचिवपदी अ‍ॅड. जांभळे नेहा नारायण ४ हजार ४ मते घेऊन विजयी ठरल्या. सर्वसाधारण सचिवपदी अ‍ॅड. जांभुळकर सम्राट शिवाजी यांनी ४ हजार २७२ मते मिळवून प्रथम क्रमांक मिळवला, तर अ‍ॅड. पोटे अभिजीत सुहास ३ हजार ३४४ मतांसह द्वितीय क्रमांकावर निवडून आले.

महिला राखीव हिशेब तपासनीसपदी अ‍ॅड. पवार पूजा चंद्रशेखर (३ हजार ८७६) आणि खजिनदारपदी अ‍ॅड. बांडळ अंजली शरद (४ हजार २७४) यांनी विजय संपादन केला. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी ही निवडणूक पार पडली असून, निकाल निवडणूक अधिकाऱ्यांनी अधिकृतरीत्या जाहीर केला.

## पुणेकरांना दिलासा! पाणीगळती रोखण्यासाठी महापालिकेची मोठी पावले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुरेशा पाण्यापासून वंचित असलेल्या पुणेकरांना पुन्हा एकदा दिलासा देण्याचे आश्वासन महापालिका प्रशासनाने दिले आहे. शहरातील पाणीगळती रोखण्यासाठी जुन्या पाण्याच्या टाक्यांची दुरुस्ती, नवीन टाक्यांची बांधणी तसेच जलवाहिन्यांमधील गळती शोधण्यासाठी रोबोसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या उपाययोजनांनंतर तरी किमान पाणीपुरवठा नियमित होईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले की, शहरातील अनेक भागांत आजही पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नाही. अनेक ठिकाणी जलवाहिन्या जुन्या आणि खराब झाल्याने पाणीपुरवठा करताना अडचणी येतात. या समस्यांवर मात करण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. जुन्या टाक्यांची दुरुस्ती, नवीन टाक्यांची उभारणी आणि गळती शोधण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.

शहरातील सर्व भागांतील नागरिकांना एकसमान पाणीपुरवठा व्हावा, यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. काही भागांतील जुन्या जलवाहिन्यांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत असल्याचे निदर्शनास आले असून, त्यावर आवश्यक त्या उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. पाषाण लिंक रोड परिसरातील इंग्रजकालीन पाण्याच्या टाकीची क्षमता व संरचना कमकुवत झाल्याने दररोज सुमारे चार एमएलडी पाणी वाया जात होते.

## महापालिका भवनात वाहन पार्किंगचा पेच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पिंपरी-चिंचवड महापालिकेतील प्रशासकीय राजवट संपून लोकप्रतिनिधींची राजवट सुरू होत असतानाच महापालिका भवनात वाहन पार्किंगची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. नगरसेवक, पदाधिकारी, अधिकारी तसेच विविध कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांच्या वाहनांसाठी जागा अपुरी पडत असून, अनेकांना महापालिका भवनासमोरील रस्त्यावर वाहने उभी करावी लागत आहेत. त्यामुळे परिसरात वारंवार वाहतूककोंडी होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा विभागाने वाहन पार्किंगसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याची मागणी शहर अभियंत्यांकडे केली आहे.

मुंबई–पुणे महामार्गालगत पिंपरी येथे असलेली पिंपरी-चिंचवड महापालिकेची चार मजली मुख्य इमारत १३ मार्च १९८७ रोजी तत्कालीन राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आली होती. सुमारे ३९ वर्षांपूर्वी त्या काळातील गरज लक्षात घेऊन या इमारतीत वाहन पार्किंगचे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार ८० चारचाकी आणि ३२५ दुचाकी वाहनांची व्यवस्था होती. मात्र, गेल्या काही दशकांत शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे गेली असून, नगरसेवकांची संख्याही वाढली आहे.

## कर्जत येथे २२ फेब्रुवारीला राज्यस्तरीय पत्रकार संघ पुरस्कार सोहळा

### अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा मेळावा; जिल्हा व तालुका पत्रकार संघांचा होणार सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने राज्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा व तालुका पत्रकार संघांचा गौरव करण्यासाठी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे आयोजित करण्यात आला आहे. येत्या रविवारी, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कर्जत येथील रॉयल गार्डन येथे हा भव्य कार्यक्रम पार पडणार असून, या सोहळ्यास महाराष्ट्रातील सर्व पत्रकार बंधूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी केले आहे.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणारे ‘पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ’ आणि ‘वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ’ हे प्रतिष्ठेचे राज्यस्तरीय पुरस्कार या वेळी प्रदान करण्यात येणार आहेत. यासोबतच राज्यातील तालुका अध्यक्षांचा मेळावाही याच ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक तालुका पत्रकार संघ केवळ पत्रकारितेपुरते मर्यादित न राहता सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रम राबवत असतात. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा राज्य पातळीवर गौरव व्हावा, प्रोत्साहन मिळावे आणि इतर संघनाही प्रेरणा मिळावी, या उद्देशाने प्रत्येक महसूल विभागातून एका आदर्श तालुका पत्रकार संघाची निवड करून त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जातो. या कार्यक्रमाच्या नियोजन व आढावा संदर्भात पुणे येथील दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयात नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत कार्यक्रम अधिक प्रभावी, नियोजनबद्ध आणि यशस्वी कसा करता येईल, याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच राज्यभरातील अधिकाधिक पत्रकारांनी या सोहळ्यात सहभागी व्हावे, यासाठी संपर्क, आमंत्रण व समन्वयाबाबतही नियोजन करण्यात आले.

या बैठकीस अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, शरद पाबळे, राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशे, पिंपरी-चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले, डिजिटल अध्यक्ष विनय सोनवणे, सचिव सागर सूर्यवंशी यांच्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील मान्यवर पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा ७०२ कोटींचा मालमत्ता कर वसुलीचा टप्पा पार

### आधुनिक तंत्रज्ञान व नियोजनबद्ध मोहिमेचा परिणाम; वाकड विभाग आघाडीवर, थकबाकीदारांना कर भरण्याचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत मालमत्ता कर वसुलीत नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. १ एप्रिल २०२५ ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत महापालिकेने एकूण ७०२ कोटी ७३ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला असून, शहराच्या आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

चालू आर्थिक वर्ष संपण्यास अद्याप दोन महिने शिल्लक असताना महापालिकेने कर वसुलीसाठी व्यापक मोहीम हाती घेतली आहे. त्यामुळे येत्या काळात कर संकलनाचा हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांनी कोणतीही दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी तातडीने कर भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

यंदाच्या वर्षी कर संकलन विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक केली. ऑनलाईन पेमेंट प्रणाली, विविध डिजिटल माध्यमे, मोबाईल अ‍ॅप्स यांचा वापर करून नागरिकांना घरबसल्या कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच कर भरण्याबाबत एसएमएस अलर्ट, नोटिसा आणि प्रत्यक्ष भेटीद्वारे नियमित पाठपुरावा करण्यात आल्याने वसुलीच्या प्रक्रियेला मोठी चालना मिळाली.

विभागनिहाय वसुलीचा आढावा घेतल्यास वाकड विभागीय कार्यालयाने सर्वाधिक ८७ कोटी ४४ लाख रुपयांची वसुली करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. थेरगाव विभागीय कार्यालयाने ६९ कोटी ३ लाख, चिखली कार्यालयाने ५४ कोटी २७ लाख, कस्पटे वस्ती कार्यालयाने ४९ कोटी ९८ लाख, किवळे कार्यालयाने ४७ कोटी ८७ लाख तर चिंचवड कार्यालयाने ४५ कोटी ४९ लाख रुपयांची वसुली केली आहे.

याशिवाय भोसरी विभागीय कार्यालयाने ४४ कोटी ९१ लाख, मोशी कार्यालयाने ४३ कोटी ५२ लाख, पिंपरी वाघेरे कार्यालयाने ४२ कोटी २ लाख, सांगवी कार्यालयाने ३५ कोटी २६ लाख आणि मनपा भवन कार्यालयाने ३४ कोटी २१ लाख रुपयांची वसुली केली आहे. आकुर्डी कार्यालयाने ३२ कोटी ९४ लाख, फुगेवाडी-दापोडी कार्यालयाने २८ कोटी १० लाख, चऱ्होली कार्यालयाने २७ कोटी २१ लाख, दिघी-बोपखेल कार्यालयाने २१ कोटी ४० लाख, तळवडे कार्यालयाने १७ कोटी ६३ लाख, निगडी प्राधिकरण कार्यालयाने १५ कोटी ६५ लाख तर पिंपरी नगर कार्यालयाने ५ कोटी ७८ लाख रुपयांची वसुली केली आहे.

**मालमत्ता कर संकलनात लक्षणीय वाढ**

● या कामगिरीबाबत अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले की, “कर आकारणी व कर संकलन विभागाने केलेले नियोजनबद्ध काम, नागरिकांचा वाढता सहभाग आणि वेळेत कर भरण्यासाठी देण्यात आलेल्या सवलती यामुळे चालू आर्थिक वर्षात मालमत्ता कर संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे. ही वसुली केवळ आर्थिक आकडा नसून, शहराच्या विकासासाठी नागरिकांनी दाखवलेल्या जबाबदारीची साक्ष आहे.” दरम्यान, उपायुक्त सचिन पवार यांनी स्पष्ट केले की, “मालमत्ता कर संकलनासाठी ऑनलाईन सुविधा, जनजागृती मोहीम आणि थकबाकीदारांविरोधात प्रभावी कारवाई राबविण्यात येत आहे. या सर्व उपाययोजनांमुळे आतापर्यंत कर वसुली ७०० कोटींच्या पुढे गेली आहे. उर्वरित नागरिकांनीही वेळेत कर भरून महापालिकेच्या विकासकामांना हातभार लावावा.”

## जादा नफ्याच्या आमिषाने दोन ठिकाणी कोट्यवधींची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** शेअर मार्केट, ट्रेडिंग आणि व्यवसायात मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून पिंपरी-चिंचवड परिसरात दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. पहिल्या घटनेत ट्रेडिंगच्या नावाखाली एका व्यक्तीची तब्बल ४० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली असून, दुसऱ्या प्रकरणात टूर अँड ट्रॅव्हल्स व्यवसायात गुंतवणुकीच्या बहाण्याने एका महिलेची १८ लाखांहून अधिक रक्कम लुबाडण्यात आली आहे.

ट्रेडिंग फसवणुकीच्या प्रकरणात ४२ वर्षीय व्यक्तीने चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ११ नोव्हेंबर २०२५ ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत चिंचवडगाव परिसरात ही घटना घडली. आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांना व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये सामील केले. शेअर मार्केट व ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्यास भरघोस परतावा मिळेल, असे सांगून वेळोवेळी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे भरण्यास भाग पाडले. फिर्यादीकडून एकूण ४० लाख ९ हजार १६४ रुपये घेतल्यानंतरही कोणताही परतावा किंवा मूळ रक्कम परत न देता फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल असून चिंचवड पोलीस तपास करत आहेत.

दुसऱ्या घटनेत पिंपरी येथे टूर अँड ट्रॅव्हल्स व्यवसायात गुंतवणुकीचे आमिष दाखवून एका महिलेची आर्थिक फसवणूक झाली. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून जयेश शिवराज चौधरी (वय ४०, रा. साई चौक, पिंपरी) याला अटक करण्यात आली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### डिसेंट फाउंडेशनमुळे जुन्नर तालुक्यात हजारो नेत्ररुग्णांना नवी दृष्टी

**जुन्नर :** डिसेंट फाउंडेशन पुणे, शंकरा आय हॉस्पिटल पनवेल व विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवर्य कोंडाजी बाबा डेरे आश्रमात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. शिबिरात १८४ नागरिकांची तपासणी करण्यात आली असून ४० रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले. गेल्या दोन वर्षांत डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यात पाच हजार यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या असल्याची माहिती संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी दिली.

### खंडोबा दर्शनानंतर भाविकांची परतीची वाटचाल

**पारगाव :** माघ पौर्णिमेनिमित्त महाराष्ट्राचे कुलदैवत श्री क्षेत्र जेजुरी येथे लाखो भाविकांनी श्री खंडोबा देवाचे दर्शन घेतले. दर्शनानंतर भाविक समाधान व भक्तिभावाने आपापल्या गावी परतू लागले आहेत. यावेळी जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार गावातील भाविकांनी गेल्या १६५ वर्षांची परंपरा जपत बैलगाड्यांमधून जेजुरीची वारी केली. पिवळे ध्वज, जयघोष व भजनांच्या गजरात ही भक्तिमय परतीची यात्रा ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवणारी ठरली.

### अपघात रोखण्यासाठी एनएचएआयची उपाययोजना

**पुणे :** मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील दरी पूल ते नवले पूलदरम्यान असलेल्या धोकादायक ठिकाणांवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. दरड कोसळण्याचा धोका लक्षात घेऊन कमकुवत भागांचे कॉंक्रिटीकरण तसेच संपूर्ण डोंगरावर लोखंडी जाळी बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. भेगा पडलेले खडक, माती-पाणी वाहणारे भाग ओळखून 'ब्लॅक स्पॉट'वर शॉटक्रिट, सॉईल नेलिंग व स्टोन पिचिंग करण्यात येत आहे.

---

**जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणूक प्रचाराच्या सांगता सभेत ओतूर येथे उपमुख्यमंत्र्यांची ग्वाही**

# सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतकऱ्यांचाच—शिंदे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** राज्य सरकारच्या तिजोरीवर सर्वात पहिला हक्क शेतकऱ्यांचा आहे आणि हेच धोरण डोळ्यांसमोर ठेवून सरकार काम करत आहे, असे ठाम प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ओतूर येथे आयोजित जाहीर सभेत केले. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांच्या प्रचाराच्या सांगता सभेत ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिक यांच्या हितासाठी सरकार कटिबद्ध असून विकासकामांना गती देण्याचे काम सुरू आहे. जुन्नर तालुक्यातील बिबट सफारी, आणे-माळशेज रस्ता, कोपरे-मांडवे परिसरातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी एमआय टँकची निर्मिती, चिल्हेवाडी धरण प्रकल्पाच्या उर्वरित कामांना गती देणे, तसेच श्री क्षेत्र पारुंडे येथील कुंभमेळ्यासाठी आवश्यक सोयी-सुविधांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

जुन्नर तालुका पर्यटनाच्या दृष्टीने देशातील एक मॉडेल पर्यटन तालुका म्हणून विकसित करण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल, असे सांगत पुणे-नाशिक हा अत्यंत महत्त्वाचा रेल्वे मार्ग लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

यावेळी जुन्नर तालुक्याचे आमदार शरद सोनवणे यांनी आपल्या भाषणात विविध विकासकामांच्या मागण्या मांडल्या. नाशिक कुंभमेळ्याची सांगता जुन्नर तालुक्यात होत असल्याने १६ गावांसाठी एकत्रित २४० कोटी रुपयांचा निधी मिळावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच पर्यटन व धार्मिक स्थळांच्या विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही आमदार सोनवणे यांनी केली.

पुणे-नाशिक रेल्वे मार्ग मंजूर असून त्याचा रूट बदलण्याचा प्रयत्न यशस्वीपणे हाणून पाडण्यात आला आहे. ओझर-उंब्रज मार्गावरील पुलासाठी ३५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून यापूर्वी साडे आठ कोटी रुपये मंजूर झाले असतानाही काम रखडले असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. कोपरे-मांडवे-मुथाळणे खोऱ्यातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी एमआय टँक उभारण्यात यावा, रोजगाराच्या प्रश्नासाठी आयटी पार्कला मंजुरी द्यावी, बुडीत बंधाऱ्याचा प्रश्न मार्गी लावावा तसेच शिवजन्मभूमीत सहा महाद्वार उभारावीत, अशा विविध मागण्या आमदार सोनवणे यांनी यावेळी मांडल्या.

या सभेला भानुविलास गाढवे, दिलीप डुंबरे, धनंजय डुंबरे, रंगनाथ घोलप, विश्वास आमले, संतोष डुंबरे, जालिंदर पानसरे, प्रसन्ना डोके, अनुराग फापाळे, बाळासाहेब घुले, रामदास तांबे, सिताराम तांबे, बुधाजी शिंगाडे, विकास राऊत, मंदाताई दांगट, नगरसेवक रंगनाथ औटी, दीपक हांडे, शिवसेनेचे तन्मय तांबोळी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# लोणी येथे डॉ. डी.वाय. पाटील विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबीर सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ ग्रामस्वच्छता, श्रमदान, व्यसनमुक्ती जनजागृती व वृक्षारोपणासह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव) येथे डॉ. वाय. वाय. पाटील युनिटेक सोसायटीअंतर्गत डॉ. डी.वाय. पाटील विधी महाविद्यालय, पुणे यांच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या निर्देशानुसार सात दिवसीय हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर बुधवार (दि. ४) ते मंगळवार (दि. १०) फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडणार आहे.

शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांच्या सहभागातून विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये गावातील स्मशानभूमीची स्वच्छता, वनराई पद्धतीचे बंधारे उभारणी, ग्रामस्वच्छता, श्रमदान, वृक्षारोपण तसेच वृक्षसंवर्धन व दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. यासोबतच व्यसनमुक्ती विषयावर पथनाट्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार असून, ग्रामस्थांसाठी व्याख्याने, सामाजिक विषयांवरील पथनाट्ये व ग्रामकामकाजाचे उपक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एस. गोपाकुमार, स्वाती मेहता, घोडेगाव बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. निलेश शेळके, समाजभूषण कैलासराव गायकवाड, जिल्हा परिषद शाळा लोणीचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गौरव रोकडे, माजी उपसरपंच प्रकाश गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, सेवावृत्ती व नेतृत्वगुणांचा विकास होण्यास मदत होणार असून, गावाच्या सर्वांगीण विकासात हातभार लागणार आहे. शिबिराचे संपूर्ण नियोजन एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. अर्जुन सोमवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

---

# संकष्टी चतुर्थीनिमित्त वडगाव काशिंबेग येथील अर्धपीठ गणपती मंदिरात भाविकांची गर्दी

**फुलांची सजावट, अभिषेक-आरती, प्रसाद वाटपामुळे परिसराला यात्रेचे स्वरूप**



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** संकष्टी चतुर्थीनिमित्त तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथील श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थानात गुरुवारी भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले असून, परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

पहाटे पुजारी जोशी काका यांच्या हस्ते पारंपरिक पूजा संपन्न झाली. त्यानंतर मंचर येथील मिलिंद बाणखेले, हरिश्चंद्र गाडे, अभिजीत शेटे, संतोष कडूसकर, महेश शेटे, साक्षी लांडगे, करीना कोकणे, महेंद्र घोडेकर व साक्षी शेटे यांच्या हस्ते सकाळचा महाअभिषेक करण्यात आला. आरतीनंतर मंदिर भाविकांसाठी खुले करण्यात आले. सकाळपासूनच भाविकांचा दर्शनासाठी मोठा ओघ सुरू होता.

जनसेवक रमेश येवले यांच्या हस्तेही पूजा करण्यात आली. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उमेदवार व समर्थकांनी दर्शनासाठी उपस्थित राहून भाविकांशी संवाद साधला. सायंकाळनंतर भाविकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात भाविकांनी शिस्तबद्ध रांगेतून दर्शन घेतले.

पुरातन पेशवेकालीन अर्धपीठ गणपती मंदिरावर उद्योजक श्यामभाऊ गुंजाळ यांच्या वतीने फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. मोरया मंगल कार्यालयाचे मालक सुमित लांडे यांच्या वतीने दुपारी भाविकांना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. तसेच नरेंद्र पापा घुले यांच्या वतीने पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती. मंदिराच्या पायथ्याशी हार, फुले, नारळ, पेढे व प्रसाद विक्रीची दुकाने थाटण्यात आली होती. रात्री उशिरापर्यंत भाविक दर्शनासाठी उपस्थित होते. चंद्रोदय झाल्यानंतर श्रींना नैवेद्य अर्पण करून महाआरती करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्था श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थान ट्रस्टच्या वतीने उत्तमरीत्या पार पाडण्यात आली.

---

# शाळेतील किशोरवयीन मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी स्तुत्य उपक्रम

**मासिक पाळी स्वच्छतेसाठी जुन्नर तालुक्यातील ३५ शाळांना वेंडिंग व डिसपोजल मशीनचे वाटप**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील शाळांमधील किशोरवयीन मुलींच्या आरोग्य, स्वच्छता आणि सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण व समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला आहे. डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या माध्यमातून तसेच Ashland, International Speciality Products (India) Private Limited (CSR Initiative) यांच्या सहकार्याने हा उपक्रम साकारण्यात आला असून, याअंतर्गत तालुक्यातील एकूण ३५ शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशीन व डिसपोजल मशीन बसविण्यात येत आहेत.

या उपक्रमामुळे शाळकरी मुलींना मासिक पाळीच्या काळात स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने मोठा आधार मिळणार आहे. मासिक पाळीबाबत असलेले गैरसमज दूर होऊन स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण होण्यासही यामुळे मदत होणार आहे. अनेक शाळांमध्ये मासिक पाळी हा विषय अद्यापही संकोचाचा मानला जात असताना, या उपक्रमामुळे विद्यार्थिनी अधिक खुलेपणाने आपल्या आरोग्याबाबत बोलू लागतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या कार्यक्रमांतर्गत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मानसिक आरोग्य, शारीरिक आरोग्य, मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची योग्य काळजी, वैयक्तिक स्वच्छता तसेच स्वसंरक्षण या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टिकोन आणि स्वतःच्या आरोग्याबाबत जबाबदारीची भावना निर्माण झाली आहे. यासोबतच विद्यार्थिनींना पर्यावरणपूरक सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले तसेच "कळी उमलताना" ही मार्गदर्शक पुस्तिका देण्यात आली. या माध्यमातून आरोग्यविषयक जाणीव वाढण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्वही विद्यार्थिनींपर्यंत पोहोचविण्यात आले. बारव, निरगुडे, आपटाळे, इंगळून, चिंचोली, सावरगाव आदींसह एकूण ३५ शाळांमध्ये हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. शाळेच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त, प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरला असून, शाळा प्रशासनाच्या वतीने डिसेंट फाउंडेशन व Ashland, International Speciality Products (India) Private Limited यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या प्रसंगी जुन्नर पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी श्री. अशोक लांडे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, सचिव डॉ. एफ. बी. आतार, संचालक आदिनाथ चव्हाण, डॉ. संपदा तोडकर, परिचारिका उज्वला गवळी, छाया पाटील यांच्यासह मान्यवर शिक्षक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

---

# संकष्टी चतुर्थीनिमित्त लेण्याद्रीत भाविकांचा महासागर

**अष्टविनायक श्री गिरीजात्मजाच्या दर्शनासाठी हजारो भाविकांची गर्दी**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील अष्टविनायक तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री येथे गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली होती. 'श्री गिरीजात्मज' गणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच हजारो भाविकांनी मंदिर परिसरात हजेरी लावली होती. दिवसभर भाविकांचा अखंड ओघ सुरू असल्याने लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

या पावन प्रसंगी श्री गिरीजात्मजाच्या मूर्तीला आणि संपूर्ण मंदिर परिसरात फुलांची अत्यंत आकर्षक व मनोहारी सजावट करण्यात आली होती. देवस्थान ट्रस्टच्या वतीने पहाटे ६.१५ वाजता देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे व विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापूजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी श्रद्धेने आणि भक्तिभावाने श्रींचे दर्शन घेतले. संकष्टी चतुर्थीनिमित्त देवस्थानच्या वतीने दिवसभर विविध धार्मिक विधी, पूजाअर्चा व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मंदिरात सकाळी ६ वाजता, दुपारी १२ वाजता आणि सायंकाळी ६ वाजता महाआरती संपन्न झाली. रांजणगाव येथील संतोष भाऊसाहेब शिंदे यांनी देवाच्या नैवेद्यासाठी दोन कॅरेट केळीचा प्रसाद अर्पण केला.

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता देवस्थान ट्रस्टच्या वतीने दर्शन व्यवस्था सुकर होण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. रांग व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी तसेच इतर आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले. दिवसभर भाविकांसह पर्यटकांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती दिसून आली. सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांचे भक्तिमय संगीत भजन सादर झाले. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची विशेष महाआरती करण्यात आली. त्यानंतर गोळेगाव येथील मंगेश जयवंत डोके आणि जुन्नर येथील पंढरीनाथ शिवराम धोंडकर यांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



लोणी येथील कॅनरा बँकेसमोरील वळणावर उसाचे वाढे घेऊन जाणारा टेम्पो क्रेनवर धडकून पलटी झाला; सुदैवाने चालक बचावला.

---

**शिवाजीनगरात सापळा रचून दोन सराईत गुन्हेगारांना अटक; १.६४ लाखांचा मुद्देमाल हस्तगत**

# खंडणीविरोधी पथकाची कारवाई; चार देशी पिस्टल व पाच जिवंत काडतुसे जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** पुणे शहरात गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान खंडणीविरोधी पथक-२, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी मोठी आणि धडक कारवाई करत दोन सराईत गुन्हेगारांना अटक केली आहे. या कारवाईत आरोपींकडून चार देशी बनावटीची पिस्टल आणि पाच जिवंत काडतुसे असा एकूण १ लाख ६४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग व फरारी आरोपींचा शोध सुरू असताना करण्यात आली.

पोलीस अंमलदार सुरेंद्र जगदाळे आणि प्रशांत शिंदे यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस रेकॉर्डवरील आरोपी रोहित दुर्गेश धर्माधिकारी (वय २४, रा. जुनी सांगवी, पुणे) हा शिवाजीनगर येथील ज्ञानेश्वर पादुका चौक परिसरात येणार असून, त्याच्याकडे अग्निशस्त्र आहे. या माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. वरिष्ठांच्या आदेशानुसार खंडणीविरोधी पथक-२ ने सदर ठिकाणी सापळा रचला. ठरल्याप्रमाणे संशयित इसम घटनास्थळी येताच पोलीस पथकाने शिताफीने कारवाई करत रोहित धर्माधिकारी आणि त्याचा साथीदार अभिषेक राजू टेंकल (वय २३, रा. विष्णु कृपानगर, जुने शिवाजीनगर, पुणे) यांना ताब्यात घेतले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांची अंगझडती घेतली असता, आरोपींकडे लोखंडी धातूच्या गावठी बनावटीच्या सिल्व्हर रंगाच्या चार पिस्टल मॅगझीनसह आढळून आल्या. या पिस्टलची अंदाजे किंमत १ लाख ६० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याशिवाय KF 7.65 प्रकारची पाच जिवंत काडतुसे, अंदाजे ४ हजार रुपये किमतीची, आरोपींकडून जप्त करण्यात आली. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत १ लाख ६४ हजार ३०० रुपये इतकी आहे. या कारवाईमुळे शहरात बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगणाऱ्या गुन्हेगारांवर मोठा आघात झाला असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

ही संपूर्ण कारवाई मा. पोलीस आयुक्त अमितेशकुमार, मा. सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त पंकज देशमुख, मा. पोलीस उपायुक्त (गुन्हे) निखील पिंगळे व मा. सह पोलीस आयुक्त (गुन्हे-२) राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. खंडणीविरोधी पथक-२ चे पोलीस निरीक्षक राम राजमाने तसेच त्यांच्या पथकातील अधिकारी व अंमलदारांनी ही कारवाई यशस्वी केली. आरोपींकडून जप्त केलेल्या शस्त्रांचा वापर कोणत्या गुन्ह्यांसाठी होणार होता, याचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

---

# ग्राम विकास मंडळ ओतूरच्या यशात सुवर्णपान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** ग्राम विकास मंडळ ओतूर व चैतन्य विद्यालय ओतूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पातळीवर नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. पुष्पावती विद्यालय डिंगोरेचे मुख्याध्यापक शरद भिवा माळवे व चैतन्य विद्यालय ओतूरचे क्रीडा विभाग प्रमुख अमित गंगाधर झरेकर यांनी मास्टर गेम्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य आयोजित राष्ट्रीय मास्टर गेम्स क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

नाशिक येथील स्व. मीनाताई ठाकरे क्रीडा संकुलात झालेल्या स्पर्धेत शरद माळवे यांनी ५० ते ५५ वयोगटात १०० मीटर धावणे व लांब उडी या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले, तर अमित झरेकर यांनी ३५ ते ४० वयोगटात २०० मीटर धावणे प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला. या दोघांची मार्च महिन्यात थायलंड येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय आशियाई स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सत्काराला उत्तर देताना त्यांनी सातत्य, सराव व आत्मविश्वास हेच यशाचे खरे सूत्र असल्याचे सांगितले. ग्राम विकास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या यशाचे कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## सारांश वृत्त

### बनावट जीन्स रॅकेटचा पर्दाफाश

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी वायव्य दिल्लीतील लॉरेन्स रोड औद्योगिक क्षेत्रातून बनावट जीन्स उत्पादन आणि विक्री रॅकेट चालवण्याचा पर्दाफाश केला आहे आणि त्यात सहभागी असलेल्या चार जणांना अटक केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. एका प्रतिष्ठित ब्रँडच्या बनावट जीन्स, टॅग आणि लेबलचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होत असल्याची तक्रार मिळाली होती. यानंतर, लॉरेन्स रोड औद्योगिक क्षेत्रातील चार ठिकाणी अनेक छापे टाकण्यात आले, ज्यामध्ये शादीक अन्वर, रोशन झा, राजेश गुप्ता आणि साजन कुमार यांना अटक करण्यात आली.

### दिल्लीत डबल-डेकर बसची सेवा

**नवी दिल्ली :** प्रधानमंत्री संग्रहालय, राष्ट्रीय युद्ध स्मारक आणि भारत मंडपम यासारख्या प्रमुख आकर्षणांना जोडणारी पर्यटन सेवा सुरू करण्याच्या योजनेचा एक भाग म्हणून या महिन्यात दिल्लीत डबल-डेकर बसेस सुरू होणार आहेत. दिल्लीचे पर्यटनमंत्री कपिल मिश्रा यांनी सांगितले की, राष्ट्रीय राजधानीत पर्यटकांना पर्यटनाचा अनुभव सुधारण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून ही सेवा फेब्रुवारीमध्ये सुरू होईल.

### ओडिशात पोलिस कॉन्स्टेबलची आत्महत्या

**भुवनेश्वर :** नयागड जिल्ह्यात कार्यरत असलेल्या ओडिशा पोलिस कॉन्स्टेबलने त्याच्या पसंतीच्या महिलेशी लग्न करण्याच्या त्याच्या कुटुंबीयांच्या विरोधामुळे त्याच्या सर्व्हिस पिस्तूलने आत्महत्या केली, असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. मृताचे नाव सुनील सेठी असे आहे. तो २०२३ च्या बॅचचा कॉन्स्टेबल होता आणि तो ओडगाव पोलिस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या बेरुआबारी गावचा रहिवासी होता. गुरुवारी सकाळी नयागड रिझर्व्ह पोलिस कॅम्पसमधील बॅरेकच्या टेरेसवरून त्याचा मृतदेह आढळून आला.

## सपाच्या अखिलेश यादव यांचा गंभीर आरोप

# मतदारांची नावे वगळण्याचा मोठा कट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लखनौ :** समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी गुरुवारी उत्तर प्रदेशातील मतदारांची, विशेषतः अल्पसंख्याक समुदायातील मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्याचा सुनियोजित कट रचला जात असल्याचा गंभीर आरोप केला. या प्रकरणी तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती त्यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली असून, "आता इतर कोणतीही संस्था विश्वास निर्माण करत नाही," असे त्यांनी म्हटले आहे.

एक्स या समाजमाध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये यादव यांनी भाजप आणि त्यांचे सहयोगी "गुन्हेगारांसारखे वागत आहेत" असा आरोप केला. बूथ लेव्हल ऑफिसर्सना (बीएलओ) बनावट कागदपत्रांच्या आधारे पीडीए (पिछडा, दलित, अल्पसंख्याक) समाजातील, विशेषतः अल्पसंख्याक मतदारांची नावे कापण्याचा दबाव टाकला जात असल्याचा दावा त्यांनी केला. बीएलओंना धमकावले जात असून त्यांचा छळ केला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. या आरोपांना पुष्टी देण्यासाठी यादव यांनी बीएलओ असल्याचा दावा करणाऱ्या एका व्यक्तीचा व्हिडिओही शेअर केला आहे. त्या व्हिडिओत संबंधित व्यक्ती आपल्यावर होत असलेल्या दबावाबाबत माहिती देताना दिसतो.

मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यास आक्षेप घेण्यासाठी किंवा आधीच नोंद असलेले नाव वगळण्याची मागणी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म ७ चा कथित गैरवापर तातडीने थांबवावा, अशी मागणी यादव यांनी केली. प्रत्येक नागरिकाचा मतदानाचा संवैधानिक अधिकार सुरक्षित ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले.

यादव यांनी बीएलओंवर दबाव टाकणाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची, प्रकरणांची जलदगती सुनावणी करण्याची, "वैध यंत्रणा" अस्तित्वात येईपर्यंत फॉर्म ७ च्या वापरावर बंदी घालण्याची आणि आतापर्यंत सादर झालेले सर्व फॉर्म ७ अर्ज रद्द करण्याची मागणी केली. दावा-आक्षेप प्रक्रिया तात्काळ थांबवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मतदारांची नावे वगळण्याच्या कथित षड्यंत्रामागे सक्रिय असलेल्या "देशविरोधी शक्तींची" ओळख पटवण्यासाठी न्यायालयीन चौकशीची मागणीही त्यांनी केली. तसेच "प्रामाणिक पत्रकार आणि अधिकारी" यांनी पुढे येऊन या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

पीडीए समुदायाच्या हितासाठी स्थापन केलेल्या "पीडीए प्रहरी" यांना उद्देशून यादव यांनी प्रत्येक वैध मताचे संरक्षण करण्यासाठी सतर्क राहण्याचे, कथित अनियमिततेचे पुरावे गोळा करण्याचे आणि एफआयआर तयार ठेवण्याचे निर्देश दिले. सत्ताधारी पक्षाच्या या कृती "आगामी पराभवाच्या भीतीतून" होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

एका वेगळ्या पोस्टमध्ये यादव यांनी 'पीडीए' ही संकल्पना सामायिक दुःखातून जन्माला आलेली एकता असल्याचे सांगितले. अत्याचार सहन करणारे सर्वजण पीडीए असल्याचे त्यांनी म्हटले. पीडीए समाज आता एकजूट झाला असून सामाजिक न्याय, समान सन्मान, संधी आणि सामायिक समृद्धीसाठी स्वतःचे सरकार आणण्याइतका आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

भाजपच्या राजवटीत वाढलेले विभाजनाचे राजकारण, कथित अतिरेकी आणि भ्रष्टाचारामुळे त्रस्त असलेले समुदाय आता "सकारात्मक, प्रगतीशील आणि सुसंवादी पीडीए" शी जोडले जात असल्याचा दावाही यादव यांनी केला.

# स्थलांतरित कामगारांवर विवादास्पद विधान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** यावर्षी होणाऱ्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे कृषीमंत्री एम. आर. के. पन्नीरसेल्वम यांच्या एका वक्तव्यामुळे मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. उत्तर भारतीय राज्यांतून येणाऱ्या स्थलांतरित कामगारांबाबत त्यांनी केलेल्या टिप्पणीमुळे राज्यात हिंदी विरुद्ध प्रादेशिक भाषा असा जुना संघर्ष पुन्हा उफाळून आला आहे.

एका सार्वजनिक कार्यक्रमात बोलताना पन्नीरसेल्वम यांनी उत्तर भारतातील लोक फक्त हिंदी शिकतात आणि रोजगारासाठी दक्षिण भारतात येतात, असे विधान केले. उत्तरेकडील लोक तामिळनाडूमध्ये मजुरीसाठी, टेबल साफ करण्यासाठी किंवा पाणीपुरी विकण्यासाठी येतात, कारण त्यांनी केवळ हिंदी शिकली आहे, असे ते म्हणाले. याउलट, तामिळनाडूतील तरुण द्विभाषिक धोरणामुळे इंग्रजी शिकून परदेशात जात असून अमेरिका, लंडनसारख्या ठिकाणी मोठ्या संधी मिळवत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या वक्तव्याचे पडसाद उमटताच सत्ताधारी द्रमुकने नुकसान नियंत्रणाचा प्रयत्न सुरू केला. लोकसभा खासदार टी. आर. बालू यांनी मंत्र्यांच्या विधानाचा चुकीचा अर्थ काढण्यात आल्याचा दावा केला. उत्तर भारतीयांविरोधात अपमानास्पद काही बोलण्याचा पन्नीरसेल्वम यांचा हेतू नव्हता, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, राज्यावर हिंदी भाषा लादण्याच्या कोणत्याही प्रयत्नांना द्रमुकचा विरोध कायम असल्याचेही बालू यांनी सांगितले.

दरम्यान, विरोधी पक्षांनी या वक्तव्याचा तीव्र निषेध केला आहे. काँग्रेसचे कार्ती चिदंबरम यांनी सांगितले की, तामिळनाडूची अर्थव्यवस्था इतर राज्यांतून येणाऱ्या स्थलांतरित कामगारांवर अवलंबून आहे आणि अशा कामगारांचे स्वागतच केले जाते. मंत्र्यांची टिप्पणी बेजबाबदार असल्याचा आरोपही त्यांनी केला.

# चिनी मांजामुळे मृत्यू झाला तर खुनाचा गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लखनौ :** उत्तर प्रदेशात चिनी मांजामुळे एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास तो अपघात न मानता खुनाचा गुन्हा म्हणून नोंदवला जाईल, असा कडक इशारा मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिला आहे.

राज्यात चिनी मांजामुळे सातत्याने होणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही भूमिका घेतली असून, अशा प्रकरणांत आवश्यकतेनुसार थेट खुनाचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

नुकत्याच झालेल्या एका आढावा बैठकीत मुख्यमंत्री योगी यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला की, चिनी मांजावर बंदी असतानाही तो बाजारात कसा उपलब्ध आहे.

योगी आदित्यनाथ यांनी पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणांना राज्यभर विशेष मोहीम सुरू करण्याचे आदेश दिले असून, चिनी मांजा विकणारे, साठवण करणारे आणि त्याचा पुरवठा करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

मुख्यमंत्री योगी यांनी सांगितले की, चिनी मांजामुळे होणारे मृत्यू हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत. अशा घटनांकडे हलगर्जीपणे पाहिले जाणार नाही. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या या प्रकारात दोषींवर कठोरात कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच, या धोकादायक मांजाचा वापर टाळावा आणि सुरक्षित पर्याय स्वीकारावेत, यासाठी जनजागृती मोहिमा राबवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

पोलिस प्रमुखांना बेकायदेशीर चिनी मांजाच्या पुरवठा साखळीची ओळख पटवण्याचे, मोठ्या प्रमाणात छापे टाकण्याचे तसेच कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# पूर्वलक्षी पर्यावरण मंजुरी; खंडपीठाची स्थापना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करून सुरू करण्यात आलेल्या प्रकल्पांना पूर्वलक्षी पर्यावरणीय मंजुरी देण्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. अशा प्रकल्पांशी संबंधित याचिकांवर नव्याने सुनावणी घेण्यासाठी तीन न्यायाधीशांचे खंडपीठ स्थापन करण्याची विनंती गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाला करण्यात आली.

१८ नोव्हेंबर २०२५ रोजी तत्कालीन सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठाने २:१ च्या बहुमताने महत्त्वपूर्ण निर्णय दिला होता. या निर्णयात, पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांना मोठा दंड भरून पूर्वलक्षी पर्यावरण मंजुरी देण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला होता. अन्यथा हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक वाया जाण्याची शक्यता असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते. मात्र, यापूर्वी १६ मे २०२५ रोजी न्यायमूर्ती ए. एस. ओक आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने केंद्र सरकार आणि पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाला अशा प्रकारची पूर्वलक्षी मंजुरी देण्यास स्पष्ट मनाई केली होती. त्या निर्णयात पर्यावरण कायद्याच्या मूलभूत तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याचे नमूद करण्यात आले होते. नंतर, न्यायमूर्ती गवई यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने १६ मेचा निर्णय उलटवत, 'वंशशक्ती' या स्वयंसेवी संस्थेसह दाखल सर्व संबंधित याचिकांवर नव्याने सुनावणी घेण्याचे आदेश दिले होते. या खंडपीठात न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांनी बहुमताला पाठिंबा दिला, तर न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी तीव्र असहमती नोंदवली. त्यांनी पोस्ट-फॅक्टो मंजुरी ही पर्यावरण कायद्याच्या सावधगिरीच्या तत्त्वाच्या आणि शाश्वत विकासाच्या संकल्पनेच्या विरोधात असल्याचे ठामपणे नमूद केले.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर एका वकिलाने या प्रकरणावर पुन्हा सखोल सुनावणीसाठी तीन न्यायाधीशांचे स्वतंत्र खंडपीठ स्थापन करण्याची मागणी केली. यावर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी, "आपण पाहू," असे म्हणत विषय खुला ठेवला. बहुमताच्या निकालामुळे २०१७ मधील वादग्रस्त अधिसूचना आणि २०२१ मधील कार्यालयीन स्मरणपत्र पुन्हा प्रभावी ठरले आहेत. या तरतुदींमुळे आवश्यक पूर्व पर्यावरण मंजुरीशिवाय सुरू केलेल्या प्रकल्पांना दंड भरून नियमित करण्याचा मार्ग खुला झाला आहे.

# बिहार विधानसभा निकालाला आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** माजी निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या नेतृत्वाखालील जनसुराज पक्षाने बिहार विधानसभा निवडणूक २०२५ च्या निकालाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. राज्यात नव्याने निवडणुका घेण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर होण्याची शक्यता आहे.

बिहारमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) मोठा विजय मिळवत २४३ पैकी २०२ जागा जिंकल्या. विरोधकांना केवळ ३५ जागांवर समाधान मानावे लागले, त्यात काँग्रेसच्या सहा जागांचा समावेश होता. या निवडणुकीत जनसुराज पक्षाला एकही जागा मिळवता आली नाही. पक्षाच्या बहुतांश उमेदवारांना अनामत रक्कमही गमवावी लागली.

जनसुराज पक्षाने आपल्या याचिकेत बिहार सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत राज्यातील महिलांना प्रत्येकी १० हजार रुपये थेट हस्तांतरित करून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करण्यात आल्याचा दावा पक्षाने केला आहे. ही रक्कम मतदारांना प्रभावित करण्यासाठी देण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. या प्रकरणी संविधानाच्या कलम ३२४ तसेच लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम १२३ अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणी जनसुराज पक्षाने केली आहे. कलम ३२४ अंतर्गत निवडणूक प्रक्रियेचे पर्यवेक्षण आणि नियंत्रण निवडणूक आयोगाकडे असते, तर कलम १२३ अंतर्गत भ्रष्ट आचारांची व्याख्या करण्यात आली आहे.

## लाखो सरकारी कर्मचाऱ्यांना दिलासा

# ममता बॅनर्जींना सर्वोच्च झटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील लाखो सरकारी कर्मचाऱ्यांना दिलासा देत सर्वोच्च न्यायालयाने ममता बॅनर्जी सरकारला मोठा झटका दिला आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या महागाई भत्त्याच्या (डीए) थकबाकीपैकी किमान २५ टक्के रक्कम ३१ मार्च २०२६ पर्यंत कर्मचाऱ्यांना देण्याचे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले आहेत. न्यायमूर्ती संजय करोल आणि प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

न्यायालयाने स्पष्ट केले की डीए ही कोणतीही सवलत किंवा दान नसून कर्मचाऱ्यांचा हक्क आहे. त्यामुळे वारंवार मुदतवाढ मागून देयके टाळता येणार नाहीत, असा कडक संदेशही राज्य सरकारला देण्यात आला आहे. उर्वरित ७५ टक्के थकबाकी कशा पद्धतीने आणि कोणत्या कालावधीत दिली जावी, यासाठी चार सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

या प्रकरणाची पार्श्वभूमी पाहता, सर्वोच्च न्यायालयाने १६ मे २०२५ रोजीच तीन महिन्यांच्या आत डीए थकबाकी देण्याचे आदेश दिले होते. मात्र निधीचा अभाव असल्याचे कारण देत राज्य सरकारने सहा महिन्यांची मुदतवाढ मागितली होती. त्यानंतरही देयकांबाबत ठोस पावले उचलली गेली नाहीत. या वारंवार होणाऱ्या विलंबावर नाराजी व्यक्त करत न्यायालयाने आता अंतिम मुदत निश्चित केली आहे. हा आदेश पश्चिम बंगाल विधानसभेत व्होट ऑन अकाउंट सादर होण्याच्या दिवशीच आल्याने राजकीय वर्तुळातही चर्चा रंगली आहे. विधानसभा निवडणुका जवळ आल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने पूर्ण अर्थसंकल्पाऐवजी तात्पुरता व्होट ऑन अकाउंट सादर करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र न्यायालयाच्या आदेशामुळे राज्य सरकारवर मोठा आर्थिक दबाव निर्माण झाला असून, २५ टक्के थकबाकी भरण्यासाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार आहे.

दरम्यान, विरोधी पक्षनेते शुभेंदु अधिकारी यांनी या निर्णयाचे स्वागत केले. त्यांनी म्हटले की डीए हा कर्मचाऱ्यांचा मूलभूत अधिकार असून, सर्वोच्च न्यायालयाने तो स्पष्ट केला आहे. राज्य सरकारने डीए अधिकार नसल्याचा दावा करत वर्षानुवर्षे कर्मचाऱ्यांना वंचित ठेवले, परंतु अखेर न्याय मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

पश्चिम बंगालमध्ये महागाई भत्त्यावरून दीर्घकाळ वाद सुरू आहे. सध्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना मूळ पगाराच्या सुमारे १८ टक्के डीए मिळतो, तर केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना हा भत्ता ५५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्य कर्मचाऱ्यांमधील डीएतील फरक ३७ ते ४० टक्क्यांपर्यंत गेला आहे.

या तफावतीमुळेच राज्यातील कर्मचारी संघटनांकडून सातत्याने आंदोलन आणि न्यायालयीन लढा सुरू होता. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे राज्य सरकारला थकबाकी भरण्याबाबत ठोस पावले उचलावी लागणार असून, कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

# भारत कोणत्याही देशाकडून तेल खरेदीस स्वतंत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताने रशियन तेलाची खरेदी थांबवून अमेरिकेकडून कच्चे तेल घेण्यास सहमती दर्शविल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी केल्यानंतर रशियाकडून त्याला स्पष्ट इन्कार करण्यात आला आहे. भारत कोणत्याही देशाकडून तेल खरेदी करण्यास स्वतंत्र आहे आणि कच्च्या तेलाच्या पुरवठादारांमध्ये विविधता आणणे ही नवी बाब नाही, असे क्रेमलिनने स्पष्ट केले आहे.

क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की, रशिया हा भारताचा एकमेव तेलपुरवठादार नाही, हे आंतरराष्ट्रीय ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञांना चांगलेच माहीत आहे. भारताने नेहमीच विविध देशांकडून तेल आणि पेट्रोलियम उत्पादने खरेदी केली आहेत. त्यामुळे या संदर्भात काहीही नवीन घडलेले नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियन तेलाऐवजी अमेरिकेकडून, तसेच कदाचित व्हेनेझुएलाकडून कच्चे तेल घेण्यास सहमती दर्शविल्याचा ट्रम्प यांचा दावा पेस्कोव्ह यांनी फेटाळला. रशियन तेल खरेदी थांबवण्याबाबत भारताकडून कोणतेही अधिकृत निवेदन मिळाले नसल्याचेही त्यांनी सांगितले.

रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या मारिया झाखारोवा यांनीही या भूमिकेला दुजोरा दिला. भारत आणि रशिया यांच्यातील हायड्रोकार्बन व्यापार दोन्ही देशांसाठी फायदेशीर असून आंतरराष्ट्रीय ऊर्जा बाजारपेठेत स्थिरता राखण्यास मदत करतो, असे त्यांनी नमूद केले. या क्षेत्रात भारतातील भागीदारांसोबत सहकार्य सुरू ठेवण्याची तयारी रशियाने दर्शवली आहे.

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी रशियन तेल आयात थांबवण्याच्या कोणत्याही कराराचा उल्लेख केलेला नाही. राष्ट्रीय ऊर्जा सुरक्षा निधीचे प्रमुख तज्ज्ञ इगोर युशकोव्ह यांनीही भारतीय रिफायनर्स रशियन कच्च्या तेलाची आयात पूर्णपणे थांबवू शकत नसल्याचे सांगितले. अमेरिकेचे शेल ऑइल हे हलक्या दर्जाचे असून रशियाकडून येणारे युरल्स क्रूड तुलनेने जड आणि सल्फरयुक्त आहे. अमेरिकन क्रूडचा वापर करायचा असल्यास इतर ग्रेड्ससोबत मिश्रण करावे लागेल आणि त्यातून अतिरिक्त खर्च वाढेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## हाय-स्पीड रेल कॉरिडॉरवरचे स्वागत

**बेंगळुरू :** कर्नाटकचे मंत्री एमबी पाटील यांनी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी आणि एचडी कुमारस्वामी यांनी प्रस्तावित बेंगळुरू-पुणे-मुंबई हाय-स्पीड रेल कॉरिडॉरवर चर्चा करण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराचे स्वागत केले आणि म्हटले की राजकीय विचार न करता हा मुद्दा तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचवला पाहिजे. उद्योग मंत्री म्हणाले की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर लगेचच त्यांनी बेंगळुरू, पुणे आणि मुंबईला जोडणाऱ्या हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरची गरज उपस्थित केली होती.

# विरोधकांचा राज्यसभेतून सभात्याग; गोंधळ कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २०२० मधील भारत-चीन संघर्षाच्या पार्श्वभूमीवर माजी लष्करप्रमुख एम. एम. नरवणे यांच्या स्मरणपत्रातील मजकुराचा उल्लेख करण्यास विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांना परवानगी न दिल्याने गुरुवारी राज्यसभेत मोठा गोंधळ झाला. या निर्णयाच्या निषेधार्थ काँग्रेसच्या नेतृत्वाखालील अनेक विरोधी पक्षांनी सभात्याग केला.

राज्यसभेत कागदपत्रे मांडल्यानंतर अध्यक्षांनी शून्य प्रहरात एका सदस्याला मुद्दा मांडण्यासाठी बोलावले. मात्र, काँग्रेस सदस्यांनी खर्गे यांना प्रथम बोलण्याची संधी द्यावी, अशी मागणी करत आक्षेप नोंदवला. याचदरम्यान, लोकसभेत काँग्रेस नेते राहुल गांधी यांना बोलू दिले जात नसल्याचा मुद्दा उपस्थित करत खर्गे यांनी सत्ताधारी पक्षावर टीका केली. यावरून कोषागार आणि विरोधी पक्षांमध्ये जोरदार वाद झाला.

खर्गे म्हणाले की, लोकसभा आणि राज्यसभा हे दोन्ही लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत, मात्र सत्ताधारी पक्ष लोकशाही प्रक्रिया अडथळ्यात आणत आहे. त्यांच्या या आरोपांना सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी तीव्र विरोध केला. गोंधळ वाढला तेव्हा खर्गे यांनी माजी लष्करप्रमुख नरवणे यांच्या अप्रकाशित स्मरणपत्रातील उतारा उद्धृत करण्याचा प्रयत्न केला. सदस्यांनी याला तीव्र आक्षेप घेतला.

## सुरक्षा परिस्थितीत सुधारणा; केंद्राशी चर्चा सुरू, पर्यटन क्षेत्राला गती देणार

# बंद पर्यटनस्थळे उघडण्याची वेळ: मुख्यमंत्री अब्दुल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**श्रीनगर :** गेल्या वर्षी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून बंद करण्यात आलेली जम्मू-काश्मीरमधील पर्यटनस्थळे आता पुन्हा सुरू करण्याची वेळ आली आहे, असे मत मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी गुरुवारी व्यक्त केले. जम्मूमधील विधानसभेत बोलताना त्यांनी या निर्णयामुळे पर्यटन क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल, असे संकेत दिले.

पहलगाम हल्ल्यानंतर अनेक पर्यटन क्षेत्रे अजूनही बंद असल्याचे निदर्शनास आणून देत ओमर अब्दुल्ला म्हणाले की, सुरक्षा परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असून त्यामुळे ही स्थळे पुन्हा उघडण्याचा विचार होणे आवश्यक आहे. या संदर्भात केंद्र सरकारशी सातत्याने संपर्कात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गृहमंत्री लवकरच जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर येत असून, त्यांच्याशी भेटीत बंद पर्यटनस्थळांचा मुद्दा उपस्थित केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाममधील बैसरन कुरणात झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २५ पर्यटक आणि एका स्थानिक पोनीवाल्याचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर सुरक्षेच्या दृष्टीने खोऱ्यातील ४८ पर्यटनस्थळे बंद करण्यात आली होती. या ठिकाणी सुरक्षा ऑडिट करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले होते. त्यानंतरच्या काळात सुरक्षेची स्थिती हळूहळू सुधारल्याने यापैकी काही पर्यटनस्थळे पुन्हा पर्यटकांसाठी खुली करण्यात आली. मात्र अजूनही अनेक लोकप्रिय आणि संवेदनशील भाग बंदच आहेत. यामुळे स्थानिक पर्यटन व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. हॉटेल, टूर ऑपरेटर, घोडेवाले आणि मार्गदर्शक यांची उपजीविका धोक्यात आली आहे.

पर्यटन क्षेत्राशी संबंधित संघटना आणि हितधारकांनी सरकारकडे सातत्याने मागणी केली आहे की, पहलगाम हल्ल्यानंतर बंद करण्यात आलेली सर्व पर्यटनस्थळे टप्प्याटप्प्याने पुन्हा सुरू करण्यात यावीत. पर्यटकांचा विश्वास पुन्हा मिळवणे आणि पर्यटन क्षेत्राला पुनरुज्जीवित करणे ही सध्याची गरज असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. गेल्या महिन्यात प्रशासनाने दक्षिण काश्मीरमधील मार्गन टॉप, चौहर नाग आणि सिंथन टॉप तसेच उत्तर काश्मीरमधील तंगमार्गच्या वरच्या वनक्षेत्रात ट्रेकिंग, हायकिंग, कॅम्पिंग आणि इतर बाह्य उपक्रमांवर तात्पुरती बंदी घातली होती. या भागांमध्ये सुरू असलेल्या सुरक्षा कारवायांमुळे हे निर्बंध लागू करण्यात आले होते.

स्थानिक रहिवाशांना या क्षेत्रात जाण्यापूर्वी पोलिसांना माहिती देणे बंधनकारक करण्यात आले होते, तर बाहेरील पर्यटकांना वरच्या आणि घनदाट वनक्षेत्रात प्रवेश करण्यास सक्त मनाई करण्यात आली होती. जम्मू प्रदेशातील उंच आणि जंगलांनी व्यापलेल्या भागात सुरक्षा दलांनी सुरू केलेल्या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर हे निर्बंध लादण्यात आले होते. आता सुरक्षा परिस्थिती नियंत्रणात येत असल्याने, पर्यटनस्थळे पुन्हा सुरू करण्याबाबत सरकार सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा पर्यटन क्षेत्रातील घटकांकडून व्यक्त केली जात आहे.